


UNITE FOR GOOD

# अजिंठा

सप्टेंबर- २०२५ ● अंक- ३ रा



आर.आय.प्रेसिडेंट
रो.फ्रान्सिस्को अरेझ्झो



डिस्ट्रीक्ट गव्हर्नर
रो.ज्ञानेश्वर शेवाळे



प्रेसीडेंट
रो.गिरीश कुलकर्णी



ऑन.सेक्रेटरी
रो.सुभाष अमळनेरकर



बुले.कमिटी चेअरमन
रो.कॅ.मोहन कुलकर्णी

Rotary | UNITE FOR GOOD

ROTARY CLUB JALGAON

R. I. Dist. 3030 | Club No. 15512 | RIY : 2025-26
Estd. 6th February 1950

## संपादकीय...

नमस्कार, रोटरी प्रणाम, जय हिंद...

सप्टेंबर महिन्याचा हा आपला तिसरा अंक. या अंकात ऑगस्ट महिन्यात झालेल्या साप्ताहिक सभा, प्रोजेक्टस् या व्यतिरिक्त अनेक माहितीपूर्ण लेख आपल्याला वाचायला मिळतील. आपल्या विनंतीवरून पुण्याचे डिस्ट्रीक्ट ३१३१ चे पीडीजी डॉ.दीपक शिकारपूर यांनी "Literacy and Basic Education" या विषयावर (सप्टेंबर महिना Designated Month) उत्कृष्ट लेख लिहिला आहे. तो आपणांस नक्कीच उद्बोधक आणि विचार प्रवर्तक वाटेल अशी खात्री आहे. साक्षरता आणि शिक्षण या दोन्ही गोष्टींचे महत्त्व वेगळे सांगायला नको. जगप्रसिद्ध नेते डॉ.नेल्सन मंडेला यांनी म्हटलेच आहे, ''शिक्षण हे प्रभावी अस्त्र आहे, जे वापरून तुम्ही जग बदलू शकता'' तसेच आपले भूतपूर्व राष्ट्रपती डॉ.अब्दुल जे कलाम यांनी सुद्धा म्हटले आहे, 'शिक्षणामुळे नवनिर्मिती होते, नवनिर्मितीतून विचार जन्माला येतात. विचारातून ज्ञानाची कवाडे उघडतात, ज्ञानातून आपण अधिक परिपूर्ण होत जातो. आपण अनुभवलेच असेल यावर्षी आपला बराच फोकस हा विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिकदृष्ट्या प्रगल्भ करणाऱ्या प्रोजेक्टस्वर आहे.

मागील ऑगस्ट महिना तर विविध उपक्रम आणि वैविध्यपूर्ण साप्ताहिक सभांनी भरलेला होता. यात दि.१८ ऑगस्ट रोजी वरीष्ठ निवृत्त सैन्य अधिकारी ले.जनरल विनोद खंडारे यांची 'ऑपरेशन सिंदूर व भविष्यातील युद्धे व युद्ध पद्धती' यावरील प्रकट मुलाखत फारच नाविन्यपूर्ण व माहितीपूर्ण झाली. दि.२७ ऑगस्टला श्री गणरायाचे आगमन आपण वाजत गाजत केले आहे आणि आपणा सर्वांना सद्‌बुद्धी व चांगले कार्य करण्याची सदैव प्रेरणा दे अशी प्रार्थना करून पुढे अनंतचतुर्दशीला भावपूर्ण निरोपही देणार आहोत. आपल्या प्रतिक्रिया द्यायला विसरू नका.

**– रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी**

## अध्यक्षीय मनोगत...

प्रिय रोटरी मित्रांनो, रोटरी प्रणाम !

गौरी–गणपती आणि येणाऱ्या नवरात्रोत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! सण हे आनंद, ऐक्य आणि सकारात्मकतेचे प्रतीक आहेत. या उत्सवांच्या निमित्ताने आपणही समाजसेवेत अधिक जोमाने सहभागी होऊ या.

सप्टेंबर महिना रोटरीच्या बेसिक एज्युकेशन अँड लिटरसी या फोकस क्षेत्रासाठी आहे. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. आपण या दृष्टीने RIPE हा एक महत्वाकांक्षी प्रकल्प राबवित आहोत.शाळांमधील विद्यार्थ्यांना पुस्तके, वह्या, मूल्याधारित साहित्य देणे ही केवळ मदत नसून उज्ज्वल भविष्याची पायाभरणी आहे.

ऑगस्ट महिन्यात आपल्या क्लबने विविध उपक्रमांद्वारे सेवा घडवली भोणे येथील पुरग्रस्तांना मदत, वारसा छायाचित्र स्पर्धा, विद्यार्थ्यांना वह्या वाटप, शूज व सॉक्स वाटप, माजी सैनिक आरोग्य तपासणी, पर्यावरणपूरक गणपती कार्यशाळा, वृक्षारोपण, देशभक्तीपर गीत गायन, तसेच प्रा. प्रकाश पाठक व लेफ्टनंट जनरल विनोद खंदारे यांची प्रेरणादायी व्याख्याने. या सर्वांतून रोटरीची सेवा, संस्कार व सामाजिक जाणीव अधिक दृढ झाली.

आगामी उपक्रमांमध्ये गणपती आरास स्पर्धा, संकल्प चांगला माणूस बनण्याचा पुस्तके वितरण, अंध व्यक्तींसाठी स्वयंसिद्धता कार्यशाळा, ज्येष्ठ नागरिक कार्यशाळा, विद्यार्थी आरोग्य तपासणी तसेच आरसीसी, रोटरॅक्ट व रोटाकिड्स स्थापनेचा संकल्प आहे. हे सर्व उपक्रम रोटरीला नवा उत्साह व नवी दिशा देतील.

प्रिय रोटेरियन मित्रांनो, प्रत्येक उपक्रमाची खरी ताकद आपल्या सक्रिय सहभागात आहे. चला तर मग, सेवेतून आनंद अनुभवू, एकत्र येऊ आणि या वर्षीचा मंत्र स्वीकारू – "Unite for Good!"

**– रो.गिरीश कुलकर्णी**

# साप्ताहिक सभा

## ऑगस्ट महिन्यातील साप्ताहिक सभा




**✻ दि. १ ऑगस्ट –** रोजी ही साप्ताहिक सभा आपण Membership & New Club Development अंतर्गत ''आओ रोटरी को जाने'' या विषयावर आयोजित केली होती. यात रोटरी सदस्याने आपल्या परिचयातील एका व्यक्तीला सभेसाठी घेऊन यायचे होते. जेणेकरून त्या व्यक्तीस रोटरीची कार्यपद्धती माहिती होते. 'Each one bring one' ही प्रणाली रोटरी मध्ये बरेच वर्षांपासून प्रचलित आहे.




**✻ दि. ८ ऑगस्ट –** रोजी या सभेत धुळ्याचे थोर अभ्यासक वरीष्ठ विचारवंत व प्रसिद्ध वक्ते श्री.प्रकाश पाठक यांचे 'देश सेवेचा अन्वयार्थ' या विषयावर भाषण झाले. ही पब्लीक मिटींग होती आणि शहरातील व इतर रोटरी क्लब मधील अनेक मान्यवर उपस्थित होते.




**✻ दि. २२ ऑगस्ट –** रोजी या सभेत 'वारसा' फोटोग्राफी स्पर्धेत भाग घेतलेल्या विजेत्या स्पर्धकांचा बक्षीस समारंभ आयोजित केला होता. यात प्रेस फोटोग्राफर आणि इतर नागरिक असे दोन गट केले होते. या समारंभास उपस्थित माननीय खासदार श्रीमती स्मिताताई वाघ यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. रो.राजेश यावलकर यांनी सूत्र संचालन केले.




**✻ दि. २९ ऑगस्ट –** रोजी झालेल्या सभेत आपल्या क्लबला एकूण २३ ॲवार्डस् मिळाल्याबद्दल सगळ्या संबंधीत रोटेरिअरन्सचा सत्कार करण्यात आला. यात ८ Recognition Trophies असून १५ Club Awards आहेत. आयपीपी रो. ॲड.सागर चित्रे यांना बेस्ट प्रेसिडेंट म्हणून ॲवॉर्ड मिळाले आहे.

# प्रोजेक्ट

## ऑगस्ट महिन्यातील प्रोजेक्ट



**✻ दि. २ ऑगस्ट ते १६ ऑगस्ट –** या दरम्यान एकूण ११ शाळांमध्ये ७x७x७ या प्रोजेक्टच्या अंतर्गत आपल्या क्लबच्या पुढील सदस्यांनी विद्यार्थ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. रो.डॉ.शुभदा कुलकर्णी, रो.स्वाती ढाके, रो.गिरीश कुलकर्णी, रो.पंकज व्यवहारे, रो.डॉ.सतीश शिंदाडकर, रो.डॉ.पवन बजाज, रो.डॉ.रवि हिरानी, रो.राजेश वेद, रो.ॲड.आनंद मुजुमदार, रो.कंवरलाल संघवी. सर्व विद्यालयांनी या उपक्रमास अतिशय चांगला प्रतिसाद दिला आहे. प्रोजेक्ट चेअरमन रो.सुबोध सराफ यांचे विशेष अभिनंदन

**✻ दि. ४ ऑगस्ट –** मेडीकल कमिटीच्या अंतर्गत माजी अध्यक्ष रो.डॉ.तुषार फिरके यांनी त्यांच्या विष्णूलीला हॉस्पीटल मध्ये १९ लाभार्थ्यांची विनामूल्य मोतीबिंदूची शस्त्रक्रिया केली. यावेळी रो.गिरीश कुलकर्णी, रो.सुभाष अमळनेरकर, रो.पंकज व्यवहारे, रो.डॉ.जयंत जहागीरदार व रो.विजय जोशी हे उपस्थित होते.







**✻ दि. ८ ऑगस्ट –** रोटरी क्लबचे सदस्य व इतर शहरातील संस्था यांना एकूण २०० रोपांचे वाटप करण्यात आले आहे. यात पर्यावरण समिती प्रमुख रो.राकेश चव्हाण व इतर सदस्य यांचे सहकार्य लाभले. सदस्यांनी रोप लावून त्याचा दर तीन महिन्यांनी फोटो पाठवायचा आहे. नंदनवन सोसायटीत २५ रोपांची लागवड केली आहे.

**✻ दि. १० व २४ ऑगस्ट –** वाचन कट्टा– रोटरी क्लब जळगाव आणि व.वा.जिल्हा वाचनालय, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने १० ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य समरावरील साहित्याचे वाचन करण्यात आले. तसेच दि.२४ ऑगस्ट रोजी अभियंता भवन येथे आयोजित वाचन कट्टा मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांचे वाचन करण्यात आले. यावेळी सुप्रसिद्ध कवयित्री सौ.माया धुप्पड व लेखिका सौ.पुष्पा साळवे यांची व श्री.साहेबराव पाटील, श्री.प्रमोद पाटील, श्री.महेंद्र इंगळे यांची उपस्थिती होती.



# प्रोजेक्ट

## ऑगस्ट महिन्यातील प्रोजेक्ट



**✻ दि. १२ ऑगस्ट –** श्रीराम माध्यमिक विद्यालय येथे मेडीकल कमिटीतर्फे २५० विद्यार्थ्यांची डोळे, दात व जनरल वैद्यकीय तपासणी करण्यात आली. या वैद्यकीय शिबिरासाठी डॉ.जयंत जहागीरदार, डॉ.तुषार फिरके, डॉ.पवन बजाज, डॉ.हेमंत बाविस्कर, डॉ.महेश पाटील, डॉ.माधुरी कासट, डॉ.लोकेश चौधरी, डॉ.साधना पाटील यांनी तपासणी केली. रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, रो.सुभाष अमळनेरकर, रो.पंकज व्यवहारे व इतर अनेक सदस्यांची प्रमुख उपस्थिती होती.

**✻ दि. ८,१३,२५ ऑगस्ट –** दि.८ ऑगस्ट रोजी जिजामाता माध्यमिक विद्यालय, अभिनव विद्यालय येथील विद्यार्थिनींना राखी बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच दि. १३ ऑगस्ट रोजी नंदिनीबाई वामनराव मुलींच्या विद्यालयात व दि.२५ ऑगस्ट रोजी या.दे.पाटील विद्यालयात पर्यावरण पूरक गणपती मूर्ती बनविण्याची कार्यशाळा आयोजित केली होती. सदर दोन्ही उपक्रम इंटरॅक्ट क्लब तर्फे आयोजित करण्यात आले.





**✻ दि. १६ ऑगस्ट –** वारसा–फोटोग्राफी स्पर्धा व प्रदर्शन– पुढच्या पिढीला आपला समृद्ध वारसा समजावा आणि प्रत्येक जळगावकरांच्या हृदयात अभिमान जागावा हाच उद्देश समोर ठेवून रोटरी क्लब जळगावने हा प्रोजेक्ट राबविला होता. उद्घाटन पु.ना.गाडगीळ ज्वेलर्स यांच्या कलादालनात झाले. या स्पर्धेमध्ये एकूण १९० चित्र प्राप्त झाले. त्यापैकी ८० चित्रांचे प्रदर्शन कलादालनात प्रदर्शित केले होते व दि.३१ ऑगस्ट पर्यंत हे प्रदर्शन खुले ठेवण्यात आले होते. या स्पर्धेचे परीक्षण श्री.आनंद मल्हारा, तुषार बुंदे, प्रमोद घोळके यांनी केले.

**✻ दि. १७ ऑगस्ट –** रोटरी क्लब जळगाव व डॉ.मिलिंद वायकोळे यांच्या संजीवन हार्ट हॉस्पीटलच्या संयुक्त विद्यमाने माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी शिबीर आयोजित केले होते. यात त्यांचे रक्त, ब्लड प्रेशर, ई.सी.जी., २डी इको या बरोबरच डोळे व हाडांची तपासणी करण्यात आली. यात एकूण ४५ माजी सैनिक व त्यांचे कुटुंबिय यांनी सहभाग नोंदविला होता. डॉ.मिलिंद वायकोळे, डॉ.रूपाली वायकोळे, डॉ.जयंत जहागीरदार, प्रोजेक्ट चेअरमन कॅप्टन कुलकर्णी, रो.गिरीश कुलकर्णी, डॉ.महेश पाटील व इतर अनेक सदस्य या शिबिरास उपस्थित होते.



# प्रोजेक्ट

# ऑगस्ट महिन्यातील प्रोजेक्ट



✻ **दि. २० ऑगस्ट –** भोणे, ता.धरणगाव येथे महापूर आल्याने तेथील कुटुंबे अक्षरश: उघड्यावर पडली होती. रोटरी क्लब जळगावने त्यांना सहानुभूतीपूर्वक मदतीचा हात दिला. २० कुटुंबाना महिनाभर पुरेल असे जीवनावश्यक वस्तू व किराणा साहित्य वितरीत केले. यात क्लबच्या अनेक सदस्यांनी मदत केली. यावेळी अध्यक्ष नॉन मेडीकल कमिटी चेअरमन व अनेक सदस्य उपस्थित होते.

✻ **दि. १३ व २० ऑगस्ट –** दि.१३ ऑगस्ट रोजी जळगाव शहर महानगरपालिका शाळा क्र.३२, सुप्रीम कॉलनी येथील १०० विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या. तसेच दि. २० ऑगस्ट रोजी शकुंतला प्राथमिक विद्यालयात १ ली ते ४ थी च्या १३६ विद्यार्थ्यांना बूट व मोजे वाटप करण्यातआले. हे दोन्ही प्रोजेक्ट नॉन मेडीकल कमिटी चेअरमन रो.संदीप शर्मा यांनी आयोजित केले होते.



## जुलै महिन्यातील १००% उपस्थित सदस्य– अभिनंदन

रो.सुभाष अमळनेरकर, रो.डॉ.पवन बजाज, रो.ॲड.हेमंत भंगाळे, रो.दीपिका चांदोरकर, रो.कमलेश चांदवाणी, रो.जितेंद्र ढाके, रो.स्वाती ढाके, रो.रितेश जैन, रो.नंदकिशोर जाखेटीया, रो.मनोज जोशी, रो.प्रदीप खिंवसरा, रो.गिरीश कुलकर्णी, रो.डॉ.सतिश शिंदाडकर, रो.संध्या महाजन, रो.महेश पाटील, रो. सुबोध सराफ, रो.संदीप शर्मा, रो.पंकज व्यवहारे.

## ऑगस्ट महिन्यातील १००% उपस्थित सदस्य– अभिनंदन

रो.पराग अग्रवाल, रो.किरण बेंडाळे, रो.कमलेश चांदवाणी, रो.योगेश चौधरी, रो.जितेंद्र ढाके, रो.स्वाती ढाके, रो.योगेश गांधी, रो.डॉ.जयंत जहागीरदार, रो.रितेश जैन, रो.नंदकिशोर जाखेटीया, रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी, रो.शुभदा कुलकर्णी, रो.गिरीश कुलकर्णी, रो.शशिकांत कुलकर्णी, रो.रॉबीन लुल्ला, रो.चंदन महाजन, रो.संध्या महाजन, रो.पुनम मानुधने, रो.डॉ.महेश पाटील, रो.नित्यानंद पाटील, रो.संजय फडणीस, रो.सुबोध सराफ, रो.संदीप शर्मा, रो.पंकज व्यवहारे, रो.राजेश यावलकर, रो.राजेश वेद, रो.प्रेम कोगटा, रो.डॉ.सुनिल सुर्यवंशी, रो.ॲड.हेमंत भंगाळे,

रोटरी मंथ निमित्ताने

# डेसीग्नेटेड मंथ- साक्षरता नवीन परिणाम

पी.डी.जी.डॉ. दीपक शिकारपूर, पुणे



सप्टेंबर महिना रोटरीमध्ये बेसिक एज्युकेशन व लिटरसी ह्या घोषवाक्याचा आहे . आजघडीला आपला भारत देश एका संक्रमणावस्थेतून जातो आहे. सध्या विविध आघाड्यांवरच्या प्रगतीचा किंवा विकासाचा वेग किंचित मंदावल्यासारखा दिसतो आहे खरा. मंदीचे ढग अजूनही क्षितिजावर रेंगाळत आहेत, ते पूर्णपणे दिसेनासे झालेले नाहीत. पण सगळेच चित्र निराशाजनक नक्कीच नाही. विकासाचा, वाढीचा, उत्पादनाचा वेग मंदावला आहे परंतु थांबलेला नाही. ही अवस्था लवकरच जाईल. जगात अशा रीतीने चिरंतन किंवा शाश्वत काहीही नसते आणि म्हणूनच ह्या मंदीचा जास्त बाऊ करू नये. कारण ह्या परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी आणि दैदिप्यमान यश मिळवण्यासाठी जी बाब खऱ्या अर्थाने आवश्यक आहे ती आपल्याकडे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे – पैसा नव्हे तर विविध कौशल्ये आत्मसात केलेली माणसे उर्फ स्किल्ड मॅनपॉवर. सन २०३५ पर्यंत आपण एका विकसित देशाचे नागरिक असू हे नक्की आणि त्यातून आपण एका वेगळ्या मार्गाने – जगावर राज्यही करू शकू. त्यासाठी लष्कर, राजकारण, पैसा ह्या गोष्टींची आवश्यकता नाही की नव्याने एखादी ईस्ट इंडिया कंपनी स्थापून मुलुख पादाक्रांत करण्याचीही गरज नाही. आपण एक आर्थिक महासत्ता होण्याचा प्रयत्न करू आणि ह्या मोहिमेत आपले लढवय्ये असतील हे कुशल मोहरे. माझ्या दृष्टीने आयटी ह्या शब्दप्रयोगाचा अर्थ आहे इंडियाज टॅलेंट. वेगळ्या दिशेने विचार करून आपल्याकडे भरपूर प्रमाणात असलेल्या ह्या मनुष्यबळाचा योग्यरीतीने वापर करण्याची वेळ आली आहे. तरूणवर्गाची इतकी मोठी संख्या असलेले फारच थोडे देश जगात आहेत. जगातील बहुसंख्य देशांमधल्या नागरिकांचे सरासरी वयोमान वाढत चालले आहे आणि झपाट्याने मध्यमवयीन बनणाऱ्या ह्या जगातला फार मोठा तरुणाईचा साठा आपल्याकडे आहे. ही फार महत्त्वाची जमेची बाजू आहे. ह्या तरूणवर्गाला योग्य प्रशिक्षण दिले गेले की त्यांच्याकडून देशाच्या अर्थकारणात मोठे सकारात्मक बदल घडवून आणता येतील. आधुनिक संशोधनाद्वारे मल्टिपल इंटेलिजन्स ही संकल्पना पुढे आली आहे. करिअर निवडताना आपली बुद्धिमत्ता नेमकी कोणत्या प्रकारची आहे. याची चाचपणी करून करिअरच्या घोडदौडीत उतरायला हवे. पदवी ++ (हेच यशाचे समीकरण आहे). पदवी , पहिला + आहे कौशल्याचा व दुसरा + आहे कार्यानुभवाचा (इंटर्नशिपचा) . सुदैवाने रोटरीच्या नेटवर्कमध्ये अनेक लघुउद्योग व स्टार्टअप्स आहेत. तिथे कार्यनुभवासाठी इंटर्नशिप्स सर्व विद्यार्थ्यांनी गांभीर्याने (स्टायपेंडचा विचार न करता) करायला हव्यात . वर्षाच्या अभ्यासक्रमात किमान इंटर्नशिप्स सहज शक्य आहेत . सुट्टीचा त्याग केला कि ते शक्य आहे .

रोटरी क्लबसने छोटे प्रकल्प (पुस्तक कंपास बॉक्स वाटप, रायला) करण्याबरोबरच भरीव कौशल्यवृद्धीचे प्रकल्प राबवायला हवेत . तरच युवा पिढीसमोर रोटरीचा आदर्श उभा राहील. संभाषण, परदेशी भाषा , डिजिटल उपकरणांची देखभाल , एआय , अँप विकसन असे काही प्रकल्प सध्या महत्वाचे आहेत. त्यांचाच गांभीर्याने विचार करा.. ह्याने भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवरची स्पर्धात्मक क्षमता वाढेल आणि शिकलेल्या तरुण पिढीला रोजगाराची मोठी संधी निर्माण होईल.

(डॉ.दीपक शिकारपूर हे आय.टी. मध्ये पी.एच.डी. झाले असून आंतरराष्ट्रीय ख्यातीचे व्यक्तीमत्त्व आहे. त्यांची आतापर्यंत आय.टी. विषयावर मराठी, इंग्रजी मिळून ५० पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. ते २००५–०५ मध्ये रोटरी क्लब शिवाजी नगर पुणे या क्लबचे प्रेसिडेंट होते तर रोटरी डिस्ट्रीक्ट ३१३१ (पुणे) चे २०१३–१४ मध्ये डिस्ट्रीक्ट गर्व्हनर होते.)

## उगवते तारे

# उंच माझा झोका

रो.ॲन.सौ.आदिती कुलकर्णी



मृण्मयी आता एम.ए. कथकच्या शेवटच्या वर्षात आहे.आता मागे वळून बघताना असं वाटतय की खरच खुप मोठा टप्प्या गाठलाय पण  अजून मोठा पल्ला गाठायचाय.
मला चांगलं आठवतय की ती नुकतीच चालायला लागली होती आणी हौसेने तिला छुमछुम वाजणारे पैंजण घेतले.तिला कुणीही म्हटलं की,लगेचच पाय आपटून छुमछुम नाच करून दाखवायची अजिबात न लाजता.ती पाच वर्षाची झाल्यावर डॉ.अपर्णा भट दिदींकडे कथक शिकण्यासाठी घेऊन गेले.क्लास घराजवळच असल्याने मग दोघी चालत,गप्पा मारत कधी बुचाची फुलं वेचत क्लासला मी तिला सोडत असे.सुरूवातीला नुसतंच पायाचं काम ( फूट वर्क) होतं ते जरा कंटाळवाणं वाटायला लागलं मग दांडी मारण्यासाठी बहाणे सुरू झाले. मग दिदींशी बोलून तिला गोडीने समजावून सांगितलं मग हळूहळू कथक आवडू लागलं. एक एक परीक्षा,गुरुपौर्णिमेनिमित्त कार्यक्रम, इतर कार्यक्रम, शाळेच्या इयत्ता, ट्युशन सगळेच वाढत होत.तारेवरील कसरत सुरू झाली. तिची  धावपळ ,दगदग,अभ्यास, होमवर्क यामुळे कथक थांबवूया असा विचार मनात यायचा पण वेळोवेळी अपर्णा भट दिदींचे मार्गदर्शन घेऊन विचार विनिमय करून त्यावर तोडगा निघत गेला.

कथकची तीसरी  चौथी परीक्षा आणि शालेय अत्यंत महत्त्वाचा आठवी ते दहावीचा काळ होता दिदींची कडक शिस्त क्लासला सुटी मिळणे शक्यच नसायचे पण आता ती अभ्यास व कथकचा बरोबर ताळमेळ जमवायला शिकली खूपच धावपळ पळापळ व्हायची तिची पण माझी खूप मनापासुन इच्छा होती की तिने विशारद पूर्ण करावं,  ती तिने पूर्ण केली.

दहावीनंतर आर्ट्स घेतले व बारावी नंतर यातच करिअर करायच ते ठरलं होतं. कोरोना काळ असल्याने ऑनलाईन प्रॅक्टिकल परीक्षा देऊन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून त्यात निवड होऊन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ललीत कला केंद्रात नृत्यविभाग एम.ए.  च्या पहिल्या वर्षासाठी प्रवेश मिळाला.

जळगावात पाया पक्का झाला होता पुण्यात तिला गुरू पंडिता शमाताई भाटे याच्याकडे गुरूकुल पध्दतीने शिकण्याची संधी मिळाली ही आम्हा सगळ्यांसाठी खूप मोठी भाग्याची गोष्ट. सकाळी आठ वाजेपासून दीदींकडे सराव मग कॉलेज,कार्यक्रम परीक्षा अभ्यास. हो, असं वाटत की काही अभ्यास असतो का तर बराच अभ्यास असतो नृत्याबरोबर नाट्यशास्त्र कलेचा इतिहास, वेगवेगळी वाद्ये त्याची माहिती व इतिहास आणी बरच काही. गुरूकुल पध्दत आहे त्यात दीदींच्या इतर कार्यक्रमाचे बॅकस्टेज संभाळणे,इतर कलाकारांचे कार्यक्रम पहायला जाणे,स्वतःचा मेकअप करणे व तो उतरवणे इतर बारीक सारीक कामे जसे की टेलर फोटोग्राफरशी को–ऑर्डिनेट करणे अशा बऱ्याच गोष्टी शिकली हा तिच्या अभ्यासाचाच एक भाग. पुण्यात जाऊन तिथे उभे रहाण सोपं नक्कीच नव्हतं पण तिने केलं अजून ही करतेय अर्थात तिची अफाट मेहनत आहे त्या मागे. पायाला भेगा पडून अक्षरशः रक्त येतं सराव करताना पण तिथे तिच्या दिदीच आहेत काळजी घ्यायला शिस्त पण कडक आहे व तितक्याच प्रेम पण करतात.चार वर्षांत तिन तिथं छोटस का असेना स्वत:चं स्थान निर्माण केलय. सर्वांशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत.

आतापर्यंत तिला दिदींच्या ग्रुप बरोबर मोठमोठ्या महोत्सवात कला सादर करण्याची संधी मिळाली आहे. ❊मुद्रा फेस्टिव्हल  एन. सी. पी. ए.मुंबई, ❊ वितस्ता फेस्टिव्हल श्रीनगर व पुणे ❊ भातखंडे संगीत महोत्सव लखनऊ ❊ नृत्य बसंत जयपूर , ❊ सदानिरा जलगंगा फेस्टिव्हल भोपाळ. अजुनही अनेक छोट्या मोठ्या कार्यक्रमात सहभाग असतो.आई म्हणुन मला खूप आनंद होतो व अभिमान पण वाटतो. त्यात तिच्या वडीलांनी तिला वेगळे करिअर निवडायला पूर्ण स्वातंत्र्य दिले आणि या अवघड प्रवासात कुटुंब म्हणून त्यांचा व माझा तिला पूर्ण पाठिंबा आहे. असं वाटतं आतातर कुठे सुरुवात आहे यशाच्या अनेक पायऱ्या अजुन पादाक्रांत करायच्या आहेत त्यासाठी देवाचे व गुरूंचे शुभाशीर्वाद व मोठ्यांचे आशीर्वाद नक्कीच लागतात ते तिला मिळत राहो या शुभेच्छा व शुभाशीर्वाद.

## बॉलीवुड टाईम्स

### जागते रहो.... रो.सुबोध सराफ



'ज़िन्दगी ख्वाब है ख्वाब में झूठ हैं क्या और भला सच है क्या.... ज़िन्दगी ख्वाब है ' मुकेश ने गायलेले हे गाणे. मोतीलाल.... पडद्या वर जिवंत करतो .'जागते राहो ' हा नितांत सुंदर सिनेमा १९५६साली 'राज कपूर या महान कलाकाराने प्रोड्यूस केला. दिग्दर्शक अमित मित्रा आणि शंभू मित्रा बेंगाली मूव्ही ' एक दिन रात्रे .' चा हा रिमेक पण अतिशय अर्थपूर्ण आणि उद्बोधक आणि 'तरलता ' या चित्रपटात दिसून येते.के. ए. अब्बास यांची स्टोरी संवेदनशील आणि 'राज कपूरचा उच्च कोटीचा अभिनय अर्थात सर्वच कलाकारांचा अभिनय उत्कृष्ट आहे या सिनेमात. इतर कलाकार डेझी इराणी प्रदिप कुमार.सुमित्रा देवी स्मिति विश्वास नाना पळशीकर इफ़्तेकार आणि स्पेशल अपिअरन्स 'नरगिस '. एकाहून एक अशी गाणी गीतकार शैलेन्द्र. सलिल चौधरी या महान कलाकाराचे 'तरल संगीत' यातील गाणी केवळ अविस्मरणीय अशीच ' लता दीदी चे अप्रतिम गाणे ' जागो मोहन प्यारे जागो, नवयुग चूमे नैन तुम्हारे ' सफी आणि बलबीर यांचे पंजाबी बोलीतील पॉप्युलर गाणे ' एवि दुनिया देवे दुहाई . तेकी मैं झूठ बोलिया कोई ना कोई ना ओये कोई ना ' आशा चे एक अप्रतिम गाणे 'ठंडी ठंडी सावन कि पुहार.पिया आज खिडकी खुली मत छोडो ' संध्या मुखर्जी आणि हरिधन यांनी गायलेल ' मैने जो लि अंगडायी तेरी मेहफिल से' ही सगळी गाणी सलिल चौधरी या महान संगीतकाराबद्दल अधिकच प्रेम निर्माण करतात' मध्यम वर्गीयांचा बुखा फाडणारे व बंद दारामागील घडणारे गुन्हे आणि सामान्य माणसाची होणारी होरपळ यात प्रभावीपणे दाखवण्यात 'राज कपूर ' कमालीचा यशस्वी झालेला आहे. या सिनेमास "Crystal Grand Prix Award आणि National Award Certificate" मिळाले. अर्थात सर्व कलाकारांची लाभलेली उत्तम साथ देखिल आहेच. उत्कृष्ट गाणी... तरल दिग्दर्शन..... आणि राज कपूरच्या बेहतरीन 'अभिनयाने ' अविस्मरणीय केलेला 'जागते रहो '.

## गोल्डन वर्डस्

### Book Review रो.पंकज व्यवहारे



**The Happiness of Pursuit**

Author :Chris Guillebeau

Best Quote in the book: Not everyone needs to believe in your dream, but you do.

Review: The book is divided into three parts: the beginnings of your quest, the journey, and arriving at the destination. The first explains where quests originate from, and how they often result from discontent with the status quo and answering a calling. If you then have the courage to pursue your quest, your journey will force you to become self-reliant and cultivate a sense of everyday adventure. Chris shows you how you can adjust time and money to make any quest practical and shines a light on some of the people he encountered in his own quest, so you can see that the long road is worth travelling. The last part explains the transformative powers of a quest. In The Happiness of Pursuit, he draws on interviews with hundreds of quitters, revealing their secret motivations, their selection criteria, the role played by friends and family, their tricks for solving logistics, and the importance of documentation.

About the Author: Chris Guillebeau born on April 4, 1978 is the author of The Art of Non-Conformity, The $100 Startup, The Happiness of Pursuit, Born for This, Side Hustle, and 100 Side Hustles. During a lifetime of self-employment that included a four-year commitment as a volunteer executive in West Africa, he visited every country in the world (193 in total) before his thirty-fifth birthday. His daily podcast, Side Hustle School, is downloaded more than two million times a month. He is also the founder of the World Domination Summit, an event for cultural creatives that attracts thousands of attendees to Portland, Oregon, every summer.

# रोटरी क्लब तर्फे स्वातंत्र्य दिन साजरा




रोटरी क्लब जळगाव तर्फे मागील वर्षाप्रमाणे यावर्षीही १५ ऑगस्ट रोजी भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. माजी अध्यक्ष रो.अशोक जोशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमात भारतीय सेनेचे एनसीसी मध्ये कार्यरत असलेले अधिकारी व २६ जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनी दिल्ली येथे पथ संचालनात सहभागी झालेल्या कॅडेटस् चा सत्कार करण्यात आला. सत्कारार्थी मध्ये सुभेदार रामकिशन, हवालदार राजू गायकवाड, वरीष्ठ लिपीक गौरव निमणे आणि रिपब्लीक डे परेड मध्ये सामील झालेले कॅडेट गुणवंत खाडे, आरीफ पिंजारी, खुश बाविस्कर, उदय पाटील व कु.साक्षी सिंग यांचा समावेश होता.

त्यानंतर क्लबच्या सारेगम समूहाच्या कलावंत सदस्यांनी देशभक्तीपर गीते सादर करून उपस्थितांमध्ये देशभक्ती अधिक प्रज्वलीत केली. सूत्रसंचालन रो.सुबोध सराफ यांनी केले. गायक कलावंतांमद्ये रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी (बासरी), रो.नित्यानंद पाटील, रो.ॲड.आनंद मुजुमदार, रो.सुबोध सराफ, रो.राजेश वेद, सौ.विशाखा पोतदार, सौ.स्मिता पाटील, सौ.वृषाली जोशी, सौ.ॲड.किर्ती पाटील, सौ.आदिती कुलकर्णी यांचा समावेश होतो. अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, रो.सुभाष अमळनेरकर, रो.पंकज व्यवहारे, रो.रितेश जैन व इतर अनेक रोटेरीअरन्स यांची प्रमुख उपस्थिती होती.









# रोटरी क्लब जळगावला जिल्हास्तरीय गौरव प्राप्त
# आयपीपी रो.ॲड.सागर चित्रे यांना बेस्ट प्रेसिडेंट पुरस्कार

दि. ३ ऑगस्ट रोजी इंटरॅशनल डिस्ट्रीक्ट ३०३० चा भव्य बक्षीस समारंभ अकोला येथे पार पडला. या समारंभात रोटरी क्लब जळगावने उल्लेखनीय यश मिळवत एकूण २३ पुरस्कार प्राप्त केले.

या सोहळ्यात क्लबचे माजी अध्यक्ष रो.ॲड.सागर चित्रे यांना ‘बेस्ट प्रेसिडेंट’ या मानाच्या पुरस्काराने गौरवण्यात आले. यासह क्लबला क्लब सर्व्हीस, कम्युनिटी सर्व्हीस, बॅलन्डस् प्रोग्रॅम, रोटरी व्हील, कॉन्फरन्स अटेंडन्स, आय केअर, बेस्ट बुलेटीन, बेस्ट अटेंडन्स, व्होकेशनल सर्व्हीस, इंटरॅक्ट ॲक्टिव्हिटीज्, कंझ्युमर अवेअरनेस, लिटरसी प्रमोशन, मेंबरशिप डेव्हलपमेंट, नॉन मेडीकल ॲक्टीव्हिटीज, डिस्ट्रीक्ट व रोटरी इंटरॅनशनलचे विशेष प्रमाणपत्र अशा विविध विभांगामध्ये उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कार प्राप्त झाले.

तसेच वैयक्तीक पातळीवर पी.डी.जी. डॉ.सिकची, रो.प्रेम कोगटा, रो.डॉ.तुषार फिरके, रो.जितेंद्र ढाके, रो.स्वाती ढाके, रो.आसिफ मेमन यांचा विशेष गौरव करण्यात आला. हा सन्मान माजी प्रांतपाल रो.राजिंदर खुराणा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे, माजी प्रांतपाल राजीव शर्मा, माजी प्रांतपाल आशा वेणुगोपाल, राजे संग्रामसिंह भोसले, किशोर केडिया, महेश मोकलकर, क्लबच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आणि सदस्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. कलबचे कार्य आगामी काळात आणखी प्रभावी आणि समाजोपयोगी ठरेल असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.






# वारसा- फोटोग्राफी स्पर्धा व प्रदर्शन
# एक नाविन्यपूर्ण उपक्रम

बातमी इतकेच छायाचित्रालाही महत्त्व असते. एक फोटो म्हणजे एक अग्रलेख असेही म्हटले जाते. त्यामुळे काहीसे दुर्लक्षित असलेल्या वृत्तपत्र छायाचित्रकारांकडे आपल्या रोटरी क्लब जळगावने लक्ष देत त्यांच्यासाठी छायाचित्रांची स्पर्धा आयोजित केली होती. त्यास भरघोस प्रतिसाद मिळाला आणि एकूण १९० छायाचित्र प्राप्त झाली. त्यातील निवडक ८० चित्रांचे प्रदर्शन सुप्रसिद्ध ज्वेलर्स पु.ना.गाडगीळ यांच्या दुकानातील कला दालनात दि. १६ ऑगस्ट रोजी आयोजित करून त्याचा शुभारंभ जिल्हा माहिती अधिकारी श्री.युवराज पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

अतिशय नाविन्यपूर्ण असा हा उपक्रम राबविला गेला आणि त्याची सर्व थरातून प्रशंसा करण्यात आली. याचे सर्व श्रेय प्रोजेक्ट चेअरमन रो.राजेश यावलकर, को-प्रोजेक्ट चेअरमन रो.सुबोध सराफ आणि अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांना व त्यांच्या संपूर्ण टीमला जाते. या प्रदर्शनास मा.खासदार श्रीमती स्मितताई वाघ, मा.जिल्हाधिकारी श्री.आयुषप्रसाद व अनेक मान्यवरांनी भेट दिली आहे. बक्षीस समारंभ दि. २२ ऑगस्ट रोजी आपल्याच रोटरी हॉल मध्ये मा.खासदार श्री.स्मितताई वाघ यांच्या हस्ते संपन्न झाला. या संपूर्ण स्पर्धेचे परिक्षण श्री.आनंद मल्हारा, श्री.तुषार बुंदे व श्री.प्रमोद घोडके यांनी केले. यातील विजेते पुढीलप्रमाणे छायाचित्रकार गटात- प्रथम क्रमांक - श्री.संधीपाल वानखेडे, द्वितीय क्रमांक- श्री.सुमित देशमुख, तृतीय क्रमांक- श्री.सचिन पाटील व उत्तेजनार्थ श्री.प्रकाश जगताप, हौशी गटातील विजेते- प्रथम क्रमांक - श्री.तुषार मानकर, द्वितीय क्रमांक- श्री.विशाल चौधरी, तृतीय क्रमांक- केतन महाजन व उत्तेजनार्थ- श्री.जे.पी.वानखेडे.





# ऑपरेशन सिंदूर व भविष्यातील युद्धे व युद्ध पद्धती
# ले.जनरल विनोद खंडारे यांची जाहीर मुलाखत




दि. १८ ऑगस्ट रोजी रोटरी क्लब जळगाव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व जळगाव जिल्हा माजी सैनिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय सैन्यातील एक अति उच्च पद भूषविलेले वरीष्ठ निवृत्त सैन्य अधिकारी लेफ्टनंट जनरल विनोद खंडारे (PVSM, AVSM, SM) यांच्याशी वरील विषयांवर संवाद साधण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. ले.जनरल खंडारे साहेबांशी संवाद कॅप्टन मोहन कुलकर्णी यांनी साधला. ले.जनरल साहेबांनी ऑपरेशन सिंदूर कसे झाले, त्याची उद्दिष्टे काय आणि आता त्यापुढे भारताची काय स्ट्रॅटेजी राहणार याबद्दल सविस्तर सांगितले. भारताने यात न भूतो न भविष्यती अशी विजयी कामगिरी केलेली आहे. त्याचा प्रत्येक भारतीयाला अभिमानच वाटायला हवा. नॅशनल सिक्युरीटी म्हणजे काय, त्याचे एकूण कार्य व स्वरूप कसे असते ते ही त्यांनी विशद केले. विकसित अन सुरक्षित भारतासाठी प्रत्येकाने सजग असले पाहिजे व आपापल्या परीने योगदान दिले पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले. यात रो.क्लबचे अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. रो.पंकज व्यवहारे यांनी जनरल साहेबांचा परिचय करून दिला. या कार्यक्रमास ब्रिगेडीअर विजय नातू (निवृत्त), ले.कर्नल अश्विन वैद्य, मेजर निलेश पाटील, विद्यापीठाचे रजिस्ट्रार श्री.विनोद पाटील, डायरेक्टर श्री.राम भावसार, डिफेन्स विभाग प्रमुख श्री.तुषार रायसिंग, श्री.भरत अमळकर, श्री.अनिल राव व रोटरीचे अनेक सदस्य आणि शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.





## यश, निवड, अभिनंदन

* आय.पी.पी. रो.ॲड.सागर चित्रे यांची जळगाव जिल्हा वकील संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन !

* नागपूर येथील रोटरी युथ एक्सचेंज (RYE) च्या Orientation प्रोग्रॅम मध्ये रो.स्वाती ढाके यांनी आयोजनात सक्रीय सहभाग घेतला.

* रो.डॉ.शमा सराफ यांनी १० दिवसीय Emotional Inteligence in Teaching and Learning हा फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम यशस्वी रितीने पार पाडल्याबद्दल त्यांना अण्णासहेब मगर महाविद्यालय पुणे तर्फे प्रमाणपत्र देण्यात आले.

* रो.डॉ.सागर जावळे यांनी प्रतिष्ठीत आय.टी.आय. कानपूर येथे आयोजित राष्ट्रीय वैद्यकीय विज्ञान अकादमीच्या परिषदेत मिडनाम स्कॉन २०२५ मध्ये दोन आमंत्रित व्याख्याने दिली. त्यांच्या शोधांचे सर्वत्र कौतुक होत आहे.









